

# गरुड झेप

www.janatabankpune.com

जानेवारी–मार्च २०१४ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित त्रैमासिक गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून,



*चालू आर्थिक वर्ष ह्या महिना अखेर संपेल. आपल्या बँकेच्या दृष्टीने हे वर्ष महत्वाचे आहे. यावर्षी रिझर्व्ह बँकेला अपेक्षीत कामगिरीच्या मूल्यांकनातील सर्व दोष दूर करून ख–या अर्थाने सशक्त होण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत आणि आपणा सर्वांच्या प्रयत्नातून आपण हे साध्य करणार आहोत.*

*भांडवलाची वृध्दी, भांडवल पर्याप्तता, नफा – नफा क्षमता, मालमत्तेची गुणवत्ता इ. परिमाणांसंबंधात आपली कामगिरी समाधानकारक आहे. कर्जाचा विस्तार उशिरा झाल्यामुळे व्याजाच्या उत्पन्नात झालेली घट, ठेवींच्या मिश्रणात प्रभावी बदल करून आणि व्याजाचा खर्च कमी करून भरून काढावी लागेल. कासा ठेवींचे प्रमाण वाढवून हे साध्य करता येईल. ग्राहक मेळावे, जनसंपर्क, कर्मचा–यांचा सक्रीय सहभाग इ. माध्यमातून कासा ठेवीत वृध्दी करता येते. कासा ठेवींची वाढ आपल्या ग्राहक सेवेवर अवलंबून आहे. बाजारातील स्पर्धेमुळे ग्राहकांच्या आपल्याकडून अपेक्षा सतत वाढत आहेत. व्यवसायाच्या विस्ताराबरोबर आपल्या बँकेचा भौगोलिक विस्तार होतो आहे. शाखास्तरावर ग्राहकांच्या गरजा आणि त्यांच्या अपेक्षा यांचा सखोल अभ्यास करून आपल्या उत्पादनात – सेवांत अनुकूल बदल करावे लागतील. शाखेत कार्यरत कर्मचा–यांनी आपली उत्पादने – ग्राहक सेवा याविषयी उपयुक्त सूचना मुख्य कार्यालयात सादर कराव्यात. अनुत्पादक मालमत्तेच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी नियोजनबध्द कार्यक्रमाची आखणी करावी लागेल. चांगल्या कर्जांची घसरण रोखून थकीत कर्जाच्या वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. बँक व्यवसायातील जीवघेणी स्पर्धा, आर्थिक मंदी, अस्थिर अर्थव्यवस्था, महागाई, तर्कशून्य सरकारी धोरण आपल्या व्यवसाय वृध्दीसाठी आव्हाने उभी करतील. पण कठोर आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जात दैदीप्यमान यश साध्य करणे आपली परंपरा आहे. पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती करूयात.*

***आपणा सर्वांना येत्या गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा !***

# स्वयं प्रेरणा...

कर्मचा–यांची कामगिरी त्यांच्या काम करण्याच्या क्षमतेवर व प्रेरणेवर अवलंबून असते.

कर्मचा–यांची काम करण्याची क्षमता त्यांना कामाशी संबंधित शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन वाढवता येते.

कर्मचा–याची कामगिरी वृध्दिंगत करण्यासाठी व्यवस्थापन नेहमी प्रयत्नशील असते. काम करण्याची प्रेरणा हा कर्मचा–याचा वैयक्तिक विषय आहे आणि प्रेरणेचा संबंध त्याच्या गरजा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची इच्छाशक्ती यावर अवलंबून असते. क्षमते बरोबरच कर्मचाऱ्यांची प्रेरणा वृध्दिंगत करण्यासाठी देखील व्यवस्थापन प्रयत्नशील असते. पगार, भत्ते, प्रोत्साहन, बढती, बदली, नेतृत्वाची संधी, सहभाग इ. प्रेरकांचा वापर करून कर्मचा–यांची प्रेरणा व्यवस्थापन वृध्दींगत करते. प्रेरकांचा प्रभाव कर्मचा–यांच्या गरजा पूर्तीच्या इच्छा शक्तीवर वर अवलंबून असतो. व्यक्तिच्या गरजा कालानुरूप, त्याच्या प्रकृतीनुरूप, त्याच्या शैक्षणिक स्तरानुरूप आणि त्याचेवरील संस्कारानुरूप बदलतात. कर्मचारी बँकेत दाखल झाल्याबरोबर त्याचेवर मूलभूत गरजांचा प्रभाव असतो. दोन वेळचे जेवण, राहण्यासाठी निवारा, अंगभर कपडा हीच त्याची गरज. पुढे संस्थेने त्याला लवकरात लवकर नियमित करावे ही गरज निर्माण होते. नियमित झाल्यानंतर लग्न, स्वत:चे घर, वाहन, मौज मजेसाठी पगारवाढ ही गरज. त्यापुढे बढती, मानसन्मान, उच्च पदाची आसक्ती आणि हे सर्व प्राप्त झाल्यानंतर सर्व स्वप्नपूर्तीच्या आनंदात तो बुडून जातो.

इच्छापूर्ती न झाल्यास सर्वसाधारण कर्मचारी व्यवस्थापनापासून दुरावतो. बदली झाली नाही, मानसन्मान, उच्च पद दिले नाही म्हणून अनेक संस्थामधून कर्मचारी नाराज झाल्याचा आणि तो संस्थेपासून दुरावल्याचे निदर्शनास येते. याउलट मोठा व्याप, व्यवसाय विस्ताराची आव्हाने, कर्मचा–यांची संख्या यामुळे प्रत्येक कर्मचा–याच्या गरजा, त्यातील व्यक्ती प्राधान्य बदल याची नोंद व्यवस्थापन ठेऊ शकत नाही. पण त्यामुळे संस्थेच्या विरोधात भूमिका घेणे केंव्हाही गैर.

नाराज कर्मचा–याची मानसिकता नकारात्मक होते. त्याची प्रामाणिक प्रतिमा, व्यक्तिमत्व डागाळते. संस्थेत कार्यरत कर्मचारी घरातील प्रत्येक घटकाचा रोल मॉडेल असतो. घरात वाढणारी मुले–मुली कुटूंब प्रमुखाला आदर्श मानतात आणि त्याचे अनुकरण करतात. तुमच्या एका नकारात्मक भूमिकेमुळे तुमचे व्यक्तिमत्व तसेच तुमचे कुटूंब उध्वस्त होते. हे टाळण्यासाठी स्वयं प्रेरणेचा अंगिकार करा, सज्जनपणा प्रामाणिकपणा, संस्थेवरील प्रेम, त्यागी वृत्ती, श्रध्दा ही जीवनाची मूल्ये बढती, बदली पेक्षा खूप मोठी आहेत. त्यांचा त्याग करू नका. यश अपयश केवळ ऊन सावलीचा खेळ असतो. आज न मिळालेली बढती एखाद्या वर्षानी पुन्हा मिळेलही पण एकदा विस्कटलेले व्यक्तिमत्व पूर्वपदावर कदापी येणार नाही. जीवनाच्या मूल्यांपासून कसल्याही परिस्थितीत दूर जाऊ नका. स्वयं प्रेरणेतूनच तुम्ही सुखी आणि आनंदी व्हाल.

# नवीन शाखांचा शुभारंभ



बाणेर शाखा शुभारंभ.




पौड रोड शाखा शुभारंभ.




कडवई शाखेच्या लॉकर सुविधेस प्रारंभ.




धनकवडी शाखा शुभारंभ.




जालना रोड, औरंगाबाद शाखा शुभारंभ.



चंदननगर शाखा शुभारंभ.

# अभिनंदन

## श्री. प्रदीप देसाई यांना 'राष्ट्रपती पोलीस पदक' सन्मान प्राप्त

आपल्या तळेगाव दाभाडे शाखेतील खातेदार श्री. प्रदीप शामराव देसाई, पोलीस महानिरीक्षक - गुन्हे अन्वेशण विभाग यांना खालील प्रमाणे पुरस्कार प्राप्त झाले.

१) दि. १ मे २०१३ रोजी पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

२) दि. ५ ऑगस्ट २०१३ रोजी उत्कृष्ट अधिकारी हा पुरस्कार मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला.

३) दि. २६ जाने २०१४ रोजी गौरवपूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले. पदक प्रदान पुढील कालावधीत नवी दिल्ली येथे, मा. राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहेत. श्री. प्रदीप देसाई यांचे हार्दिक अभिनंदन !

## सौ. ललिता सातव राष्ट्रीय समता फेलोशीप पुरस्काराने सन्मानित



आपल्या कर्वे रोड शाखेतील खातेदार 'सौ. ललिता बाळासाहेब सातव' यांना नाशिक येथील युवाशक्ती सामाजिक संस्थेने दि. ७.१२.२०१३ रोजी आमदार उत्तमराव टिकले यांचे हस्ते 'राष्ट्रीय समता फेलोशिप' पुरस्काराने गौरविले आहे.

त्या प्रख्यात प्राध्यापक व माजी संचालक श्रीमती कविता नरवणे यांच्या कन्या आहेत. त्यांचे आपल्या सगळ्यांतर्फे

**हार्दिक अभिनंदन!**

## चित्रकार सुहास बहुलकर यांना गोदावरी-गौरव पुरस्कार जाहीर

विलेपार्ले - आपल्या शाखेतील खातेदार चित्रकार श्री. सुहास बहुलकर यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा ''गोदावरी - गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. चित्रकला क्षेत्रात आपला उल्लेखनीय ठसा उमटविल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. श्री. बहुलकरांचे आमच्या बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!

## बँकेचे खातेदार श्री. केदार वर्तक यांचे नि:स्पृह व अथक सेवा योगदान

आपल्या सहकारनगर शाखेचे खातेदार श्री. केदार लक्ष्मण वर्तक गेली ३२ वर्षे मा. महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागातील ''बिनतारी संदेश वहन'' विभागात कार्यरत आहेत. या प्रदीर्घ काळातील त्यांच्या नि:स्पृह आणि अथक सेवा योगदानाची मा. केंद्र सरकार पातळीवर नोंद घेण्यात येऊन त्यांना मा. राष्ट्रपती यांनी "Medal for Meritorious Service" जाहीर केले आहे.

जनता बँक आणि सहकारनगर शाखेचे कर्मचारी यांचे तर्फे ''मन:पूर्वक अभिनंदन''! श्री. वर्तक यांच्यासारख्या कार्यक्षम अधिकाऱ्याची या देशास आणि समाजास अत्यंत गरज आहे आणि यापुढेही श्री. वर्तक असेच योगदान देत राहतील असा विश्वास आहे. त्यांचे ग्राहकत्व आम्हास अभिमानास्पद आहे. त्यांचे पुनश्च अभिनंदन !!!

## बँकेच्या सेवेतून गेल्या सहा महिन्यात निवृत्त झालेले सेवक

- श्री. जगदीश प्रभाकर भणगे
- श्री. विनोद वसंत कुलकर्णी
- श्री. दिलीप शंकर रावण
- श्री. विजय श्रीराम करवडे
- श्री. दीपक वसंत बोकील
- श्री. राजीव रामचंद्र जोशी
- श्री. काशिराम तुकाराम खाडे
- श्री. विद्याधर मनोहर जोशी
- श्री. सोमनाथ हरिभाऊ लिमये
- श्री. महिपत सोमा रांबाडे

**आपणा सर्वांना पुढील आयुष्य निरामय व दीर्घायु लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना!**

## अभिनंदन

**बँकेतील सेवकांनी खालील परिक्षांमध्ये यश संपादन केले आहे.**

| | | |
|---|---|---|
| श्री. निलेश देशपांडे | कोअरबँकिंग | CISA Jan-14 |
| श्री. संजय खांडजकर | बाजीराव रोड शाखा | CAIIB Nov13 |
| श्री. दीपक पेंडसे | डी.आर. साईट, इंदापूर | CAIIB Nov 13 |
| श्री. रवींद्र देवचके | प्रशासन | JAIIB Nov 13 |
| श्री. मंदार सरपोतदार | साखरपा | GDC&A |

**सर्वांना पुढील कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा!**

# Emotional Intelligence

1) Intelligence can also be defined as the ability of an individual to adapt to variety of situations. Intelligence refers to a property of one's mind that contains several capacities like to reason, to plan, to solve problems, to think abstract, to comprehend ideas, to learn, to use a language and more.

Intelligence is a vital element to determine behavior of an individual. More intelligent people are better able to use resources than less intelligent people.

Intelligence explains how individuals differ from one another in how they learn about and understand the world.

Intelligence is both inherited and cultivated.

Emotions are state of one's own mind and they are exhibited through joy, sorrow, fear, hate, love, surprise, anger etc. Emotions have serious impact on individual's behaviour at home and also at work place. Emotions are totally a personal matter and their range, impact depends on one's composition. No body is ready to share his or her emotions, however emotions can not be hidden.

The most serious characteristics of emotions is that they are highly focussed and object oriented.




An individual comes accross an incident, favourable or unfavourable which instigates release of harmone named adrinalin. Adrinalin combines with other harmones in the body to multiply the emotions. Emotions at this stage direct brain to initiate mostly irrational actions like harsh words, grasp a weapon and hit etc. Sadness brings a drop in energy and enthusiasm for life activities and as it deepens and approaches depression.

Mood is diluted version of emotions.

Emotions last longer than mood. However both are expressions of one's state of mind.

Impact of emotions is both positive or negtive. Positive impact boosts performance, negative damages performance of the individual and also of the organisation.

It is essential for every staff to have total control on his or her emotions. Let us efficiently manage our emotions to better our output. Mr.Sachin Tendulkar scored a brave century abroad, the next day after cremation of his father in Mumbai. Emotional intelligence refers to management of emotions.

### *Strategies for emotional intelligence*

- Knowing ones emotions
- Managing emotions
- Motivating oneself
- Recognising emotions in others
- Handling emotions

### *Skills needed for effective emotional intelligence*

- Self awareness
- Self management
- Self motivation
- Sense of empathy
- Social skills

# देवदासी युवतींचे पुनर्वसन करण्यासाठी मा. श्री. अरविंदराव खळदकर यांचे सहाय्य व मार्गदर्शन



गुलबर्गा जिल्ह्यातील सात देवदासी युवतींचे विवाह 'उत्थान' संस्थेतर्फे बसवकल्याण येथे नुकतेच झाले. नवदांपत्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठी रोजगारही उपलब्ध करून देण्यात आला आहे. या युवतींचे कन्यादान उत्थानचे अध्यक्ष डॉ. भीमराव गस्ती यांनी केले.

यासाठीचे आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन आपल्या बँकेचे अध्यक्ष आदरणीय श्री. अरविंदराव खळदकर यांनी केले. तसेच सध्या कोल्हापूर जिल्ह्यात शोषीत वर्गाच्या शेती जमिनीसंबंधी लढा सुरू आहे. वेगवेगळ्या भागात शोषितांच्या पुनरुत्थानासाठी कार्य चालले आहे.

आपल्या बँकेने केलेली मदत अत्यंत मोलाची ठरली आहे. आपल्यातील जबाबदार बँकप्रशासकाबरोबरच माणुसकीची मूल्ये जोपासलेल्या मा. खळदकर साहेबांना उत्तम आरोग्य लाभो ही सदिच्छा!

# कडवई शाखेच्या प्रथम वर्धापनदिनाचे औचित्य साधून लॉकर सुविधेस प्रारंभ

जनता सहकारी बँक लि. पुणे शाखा कडवई येथे मागील वर्षी जाने २०१३ ला विस्तारीत कक्षाचे रुपांतर परिपूर्ण शाखेत करण्यात आले. त्याला एक वर्षे पूर्ण झाले. त्याचे औचित्य साधून, ग्राहकांसाठी बँकेने लॉकर सुविधेची दि. २९ जाने. २०१४ पासून सुरुवात केली.

कडवई पंचक्रोशीतील सर्व वाड्या-वस्त्यांमधून खातेदार बँकेकडे येत असतात. याचा विचार करून बँकेने सर्व स्तरातील लोकांसाठी विविध प्रकारच्या कर्ज योजना चालू केल्या. त्यात प्रामुख्याने सोने तारण, गृह कर्ज, गृहोपयोगी साहित्य खरेदी कर्जास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद आहे. वर्षभराच्या कालावधीत बँकेने परिसरात २५० लोकांना ३.५० कोटी रु. चे कर्ज वाटप केले आहे. असे शाखा व्यवस्थापक श्री. अर्जुन वडतिले यांनी या प्रसंगी सांगितले.

लोकांच्या आग्रहास्तव ग्रामीण भागात परिपूर्ण सुरक्षेसह अल्प भाडे दरात लॉकर सुविधा बँकेने उपलब्ध करून दिली आहे. त्यासही उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

वर्धापन दिनानिमित्त पंचक्रोशीतील खातेदार, हितचिंतक, मान्यवरांनी बँकेचे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यात घोसाळकर हायस्कूलचे श्री. आंबेगावकर सर, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री. कारागीर सर, तुरळ शाळा व कॉलेजचे प्राचार्य श्री. पाटील सर, कडवईचे माजी सरपंच श्री. सागवेकर, आयडीयल ग्रुपचे अध्यक्ष श्री. कुंभार सर, शिक्षक संघटनेचे श्री. सावंत सर, पंचक्रोशीतील प्रतिष्ठित डॉक्टर श्री. नारकर, श्री. सरमोकादम, श्री. संसारे गुरुजी आदींचा समावेश होता.

# अनुकरणीय सतर्कता

बँकेच्या रत्नागिरी शाखेतील एका पेन्शन खात्यात सलग दोन महिने रू.६,१५,७९०/- एवढी मोठी रक्कम जमा झाली. बचत विभागात कार्यरत असलेले कर्मचारी श्री. प्रशांत शं. औंधकर यांच्या सतर्क नजरेत ही घटना आली. त्यांनी ठेवीदारांकडे या विषयी चौकशी केली असता, ही फरकाची रक्कम आहे असे मोघम उत्तर मिळाले. श्री. औंधकर यांनी तेवढयावर न थांबता कोषागार कार्यालयाच्या पेन्शन विभागात संपर्क साधून चौकशी केली.

पेन्शन विभागातील अधिकाऱ्यांनी नंतर फोन करून खुलासा केला की सदर रक्कम नजरचुकीने ऑनलाईन पद्धतीने बचत खात्यात जमा झाली आहे.

वास्तविक ही रक्कम केवळ रू.६,९५३/- एवढीच जमा होणे अपेक्षित आहे. जादा जमा झालेली रक्कम शाखेने कोषागार कार्यालयाकडे सुपूर्द केली. रत्नागिरीच्या कोषागार कार्यालयातील कोषागार अधिकारी यांनी पत्र लिहून श्री.औंधकर यांचे कौतूक केले आणि आभारही मानले. श्री.औंधकर यांचे सतर्कतेचा गरूडझेप परिवाराला सार्थ अभिमान आहे.

## कौतुकास्पद प्रामाणिकपणा

आपल्या ओतूर (ता. जुन्नर) शाखेमध्ये दि.२७/१/२०१४ रोजी रु. ५,५०,०००/- चा रोख भरणा करण्यासाठी बँकेत ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्या. चे कर्मचारी आले होते. परंतु सदर भरण्यामध्ये त्यांच्याकडून नजरचुकीने रु. ५०,०००/- जादा भरले गेले, परंतु आपल्या शाखेतील कॅशीयर श्री. बबन कोंडाजी भोर यांनी त्यांची कॅश टॅली झाल्यानंतर जादा भरले गेलेले रु. ५०,०००/- परत केले. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन! खरोखरच हा प्रामाणिकपणा कौतुकास्पद आहे.

**वाचकांस नम्र आवाहन**

गरूड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी गौरव पुरस्कार छायाचित्रासह ए फोर साईझच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. श्री.जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

# कासा ठेवी

बँकांच्या कामगिरीच्या मूल्यांकनात नफा आणि नफा क्षमतेला अपार महत्व आहे. उत्पन्नात वाढ आणि खर्च कमी करून नफा वृध्दीसाठी बँका प्रयत्नशील असतात. एकूण खर्चात ठेवीवरील व्याजाचा खर्च हा एकमेव सर्वात मोठा घटक आहे. ठेवींच्या मिश्रणात सकारात्मक बदल करून ठेवींच्या किंमतीवर नियंत्रण ठेवता येते. बचत आणि चालू ठेवी हे कासा ठेवीचे घटक. कासा ठेवींचा व्याजदर खूप कमी असल्यामुळे एकूण ठेवींमध्ये कासा ठेवींचे प्रमाण व्याजाचा खर्च कमी करतात आणि नफ्यात वाढ होते. उलट कासा ठेवींचे प्रमाण घटल्याने व्याजाचा खर्च वाढतो आणि त्या प्रमाणात नफा कमी होतो. आपल्या बँकेच्या बाबतीत देखील हेच होत आहे. कासा ठेवीतील १% घट खर्चात रू.२०.०० कोटीने वाढ करते. कासा ठेवीतील घसरण ताबडतोब थांबवून त्यात प्रभावी वाढ करणे ही आपली प्राथमिकता आहे.

आपण सारे जण हे आव्हान स्विकारू यात आणि ठेवीच्या मिश्रणात प्रभावी सकारात्मक बदल करून नफा वृध्दी करू यात.

(रक्कम कोटीत)

| तपशील | ३१/०३/२०११ | ३१/०३/२०१२ | ३१/०३/२०१३ |
|---|---|---|---|
| एकूण ठेवी | ३३१६.९० | ४०४५.१७ | ४९१३.२५ |
| कासा ठेवींचे प्रमाण | ३०.२६% | २५.९९% | २२.७२% |
| ठेवीवरील व्याज | २०३.४७ | २८७.७६ | ३५७.६५ |
| निव्वळ नफा | ४७.४५ | ५२.०२ | ६२.९२ |

## श्री. जयंत काकतकर यांना उत्कृष्ट सहकारी बँक कर्मचारी पुरस्कार प्रदान

आपल्या बँकेचे सह महाव्यवस्थापक (जॉईंट जनरल मॅनेजर) श्री. जयंत काकतकर यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनच्या ''कै. बापूरावजी देशमुख उत्कृष्ट बँक कर्मचारी'' पुरस्काराने नुकतेच सन्मानीत करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता ही निवड करण्यात आली आहे. गेली २८ वर्षे श्री. काकतकर आपल्या बँकेत सेवेस असून सध्या ते बँकेचे सहमहाव्यवस्थापक आहेत. बँकेतील जवळपास सर्वच विभागांमध्ये त्यांनी काम केले असून सध्या त्यांच्याकडे विधी वसूली, हिशेब व कोअर बँकींग या विभागांची जबाबदारी आहे.

श्री. काकतकर हे अभ्यासू आणि बँकिंगमधील तज्ज्ञ व्यक्तीमत्व आहे. प्रत्येक विषयाच्या, प्रश्नांच्या बाबत विविध पैलूंचा व विश्लेषक वृत्तीने विचार करून ते निर्णय घेत असतात. गुंतवणुकीबाबत त्यांच्या विशेष अभ्यास असून ते विविध ठिकाणी विशेषत: रिझर्व्ह बँकेच्या प्रशिक्षण केंद्रात व्याख्याते म्हणून नेहमी जात असतात.






**बँकिंग फ्रंटियरचा 'बेस्ट चेअरमन' पुरस्कार नाबार्डचे सरव्यवस्थापक श्री. शशिधर यांच्या हस्ते स्विकारतांना अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर. डावीकडून बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, संचालक श्री. सुनिल मुतालिक, श्री. खळदकर, बँकिंग फ्रंटियरचे श्री. बाबू नायर, श्री. शशिधर, रिझर्व्ह बँकेचे माजी महासरव्यवस्थापक श्री.रत्नाकर देवळे व बँकिंग फ्रंटियरचे श्री. मनोज अग्रवाल.**

## बँकिंग फ्रंटियरच्या वतीने 'बेस्ट चेअरमन' पुरस्कार मा. श्री. अरविंद खळदकर यांना प्रदान

नागरी सहकारी बँकांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान अधिक वेगाने विकसित व्हावे, या उद्देशाने दरवर्षी बँकिंग फ्रंटियर मासिकाच्या वतीने देशभरातील नागरी सहकारी बँकांना पुरस्काराने गौरविण्यात येते. २०१२-१३ या वर्षीचा 'बेस्ट चेअरमन' पुरस्कार आपल्या बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकरसाहेब यांना नुकताच बेंगलोर येथे झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. याशिवाय आपल्या बँकेला बेस्ट टेक्नॉलॉजी आणि सर्वोत्कृष्ट वार्षिक अहवाल असे दोन स्वतंत्र पुरस्कारही प्रदान करण्यात आले. यावेळी आपल्या बँकेचे संचालक श्री. सुनिल मुतालिक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी हे उपस्थित होते.

श्री. खळदकर साहेबांचा नेहमीच परिपूर्णतेचा आग्रह असतो. बँकेच्या कामकाजात नाविन्यता असावी, ग्राहकांना अत्युच्च सेवा द्यावी, यासाठी ते आग्रही असतात. कामात चिकाटी आणि अभ्यासपूर्ण कामकाज ही त्यांची वैशिष्ट्ये म्हणता येतील. बँकींगच्या घडामोडींबाबत ते नेहमी सतर्क असतात. यामुळेच श्री. खळदकरसाहेब हे 'बेस्ट चेअरमन' आहेत, हे निर्विवाद!

**गरुड झेप**

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)